# पुणे विद्यापीठ

नवीन महाविद्यालये / नवीन मान्यताप्राप्त संस्था सुरू करण्यासंबंधी जाहीर प्रकटन.

१. शैक्षणिक वर्ष २००८—०९ करीता

२. विद्याशाखा : अ) कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शारीरिक शिक्षणशास्त्र/शिक्षणशास्त्र/अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र नवीन महाविद्यालये

ब) सध्या संलग्न असलेल्या महाविद्यालयांमध्ये व व्यवस्थापनशास्त्र अंतर्गत मान्यताप्राप्त संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम/नवीन विषय/विद्याशाखा/तुकडीवाढ/विद्यार्थी संख्या वाढ/नैसर्गिक वाढ इ.

३. विहित अर्ज व शुल्काबाबतची माहिती पुणे विद्यापीठाच्या www.unipune.ernet.in या संकेतस्थळावर Current News मध्ये उपलब्ध आहे.

टीप : वरीलप्रमाणे नवीन महाविद्यालये/संस्था तसेच वरील प्रमाणे अभ्यासक्रम सुरू करावयाचे असेल अशा संस्थानी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ कलम ८१ व ८२ अन्वये विविध नमुन्यामध्ये अर्ज पांच प्रतीत संलग्नता शुल्क, कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षासह कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे—७ यांचेकडे ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत म्हणजेच दि. ३१ ऑक्टोबर, २००७ पर्यंत समक्ष सादर करावेत. अपूर्ण भरलेले व मुदतीनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सूचना : (१) नाशिक येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ सुरू झालेले असल्याने वैद्यकीय, युनानी, दंत, नर्सिंग, आयुर्वेद, होमिओपॅथी इ. विद्याशाखांचे पदवी पदव्युत्तर व पदविका अभ्यासक्रमाचे अर्ज तसेच या विद्याशाखेतील नवीन विषय/विद्याशाखा/तुकडीवाढ/विद्यार्थी संख्या वाढ इ. बाबतचे अर्ज पुणे विद्यापीठाकडे सादर करू नयेत याची नोंद घ्यावी.
(२) बृहत् आराखडयामध्ये दर्शविलेल्या प्रस्तावित नवीन महाविद्यालये/ संस्था यांचेसाठीच अर्ज स्वीकारण्यात येतील. याव्यतिरिक्त कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे—४११ ००७ )
जाहिरात क्रमांक— ५५ )
दिनांक : )

डॉ. भू. बा. चौगुले
प्रभारी कुलसचिव

# पुणे विद्यापीठ

शैक्षणिक वर्ष  २००६ –२०११ या कालावधीच्या शासनाकडे
यापूर्वीच पाठविण्यात आलेल्या बृहत आराखड्यात महाराष्ट्र विद्यापीठ
कायदा १९९४ कलम ८२(१) नुसार सुधारित केलेला शैक्षणिक वर्ष
२००८–०९ या वर्षाचा बृहत आराखडा

# पुणे विद्यापीठ

## शैक्षणिक विकासाचा बृहत् आराखडा

## (सन २००६ ते सन २०११)

**अ) प्रास्ताविक**

मानवाला उच्च शिक्षणाव्दारे प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणे हे विद्यापीठाचे आद्य कर्तव्य आहे. एकविसाव्या शतकात ज्ञानाधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी, उच्च शिक्षणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. अर्थात उच्च शिक्षणाचा विचार करता २१ व्या शतकातील बदलत्या परिस्थितीचे भान ठेवणे आवश्यक आहे. जागतिकीकरणामुळे आवश्यक अशा उच्च गुणवत्तेबरोबरच समाजातील आर्थिक आणि सामाजिक दुर्बल घटक उच्च शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पुणे विद्यापीठाने गेल्या ५२ वर्षाच्या कालखंडाच्या वाटचालीत या तत्वाचा अंगीकार करुन त्याची यशस्वीपणे अंमलबजावणी केली आहे. असे असले तरी यापुढील काळात ही आव्हाने पेलण्यासाठी बदलत्या परिस्थितीचे भान ठेवून शिक्षणाचे सुयोग्य नियोजन करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने काही मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. या सूचनांन्वये हा आराखडा तयार करताना विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील अविकसित भागाला किंवा ज्या क्षेत्राला सुविधा उपलब्ध नाहीत अशा क्षेत्रांकडे विशेष लक्ष द्यावयाचे आहे. त्यानुसार पुणे विद्यापीठाच्या विद्यापीठ आणि महाविद्यालये विकास मंडळाच्या सदस्यांनी एकत्रितपणे बृहत् आराखडयाचा मसुदा तयार केला. त्यानंतर विद्वत् परिषदेने सुचविलेल्या समितीने या आराखडयाचा विचार करुन योग्य त्या सूचना केल्या. त्या सूचनांचा विचार करुन तयार झालेला

आराखडा व्यवस्थापन परिषद आणि विद्वत् परिषद यांनी नेमलेल्या समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात आला. त्यांनी दिलेल्या सूचनांचा अंतर्भाव करुन आराखडयाला अंतिम स्वरुप देण्यात आले. हा आराखडा तयार करताना कुलगुरु, डॉ. नरेंद्र जाधव यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना आणि मार्गदर्शन यांचा विचार केला गेला.

**ब) पुणे विद्यापीठाची वाटचाल**

पुणे विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी, १९४९ रोजी झाली. त्यावेळी मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १२ जिल्हे पुणे विद्यापीठाकडे वर्ग करण्यात आले. त्यावेळी एकूण २३ संलग्न महाविद्यालयांमधून सुमारे ८००० विद्यार्थी पदवी आणि १८६ विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षण घेत होते. कालांतराने विद्यापीठाचे भौगोलिक कार्यक्षेत्र घटून पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यांपुरते मर्यादित झाले असले तरी विद्यार्थी, महाविद्यालये, परिसंस्था आणि पदव्युत्तर विभागांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. आज पुणे विद्यापीठाच्या ४११ एकराच्या निसर्गरम्य परिसरात ४३ पदव्युत्तर विभाग कार्यरत असून ४०८ संलग्न महाविद्यालये आणि २२६ मान्यताप्राप्त संस्था यामधून सुमारे ४,५०,००० पदवीपूर्व आणि सुमारे ८०,००० पदव्युत्तर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

५२ वर्षाच्या इतिहासात पुणे विद्यापीठाने शिक्षणाच्या बाबतीत नेहमीच प्रागतिक दृष्टिकोन अंगीकारला आहे. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे, त्याचप्रमाणे विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे निर्माण होणा—या आव्हानांना तोंड देण्यासाठी ते सक्षम व्हावेत यासाठी कालानुरुप आणि उपयुक्त असे नवनवीन अभ्यासक्रम सुरु करण्याचा विद्यापीठाने नेहमीच पुढाकार घेतलेला आहे. अभ्यासक्रमांमध्ये आवश्यक ते बदल, त्याचप्रमाणे आंतरविद्याशाखीय

दृष्टिकोनाचा स्वीकार आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे सर्वच विद्याशाखांमधील आवश्यक ते अभ्यासक्रम शिकविण्याच्या सुविधा तीनही जिल्ह्यात मोठया प्रमाणात उपलब्ध झालेल्या आहेत.

गेल्या पाच वर्षाच्या कालावधीत पुणे विद्यापीठाने अनेकविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे, त्यात नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, संशोधनासाठी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांकडून संशोधनसाठी अर्थसहाय्य मिळविणे, महाविद्यालयांच्या शैक्षणिक विकासासाठी गुणवत्तासुधार कार्यक्रम सुरु करणे, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांचे आयोजन करणे, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर सामंजस्य करार करुन शैक्षणिक आदानप्रदानाला चालना देणे, इंटरनेटची सुविधा विकसित करणे, महाविद्यालयांना मूल्यांकन करुन घेण्यासाठी प्रवृत्त करणे या आणि अशा अनेक कार्यक्रमांचा समावेश आहे. याच कालखंडात विद्यापीठाने परीक्षा पध्दत, मूल्यमापन पध्दत, विद्यापीठ प्रशासन, आर्थिक नियोजन आणि अभ्यासक्रमाचा आशय यात बदल घडवून आणले आहेत. या कालखंडात महाविद्यालयांची संख्या २५३ वरुन ४०८ वर, त्याचप्रमाणे संलग्न संस्थांची संख्या १२९ वरुन २२६ वर पोहोचली आहे. विश्वविद्यालय अनुदान आयोगाने पुणे विद्यापीठाची उत्कृष्टतेची क्षमता असणा—या देशातील पाच विद्यापीठात समावेश केला आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय मूल्यांकन मंडळाने विद्यापीठाला पंचतारांकित विद्यापीठ म्हणून मान्यता दिली आहे. या विद्यापीठाशी संलग्न १५० महाविद्यालयांनी मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण केली असून पुणे विद्यापीठ याबाबतीत देशामधील सर्व विद्यापीठांच्या तुलनेत आघाडीवर आहे. पुणे विद्यापीठात पदवी, पदव्युत्तर आणि विद्यावाचस्पती या अभ्यासक्रमासाठी शिकणा—या परदेशी विद्यार्थ्यांची संख्या दहा हजाराहून अधिक आहे.

याठिकाणी पुणे विद्यापीठाने निरनिराळया क्षेत्रांमध्ये केलेल्या भरीव कामगिरीचा थोडक्यात उल्लेख करणे उचित ठरेल. पुणे विद्यापीठाने अनेक नवीन अभ्यासक्रम पदवी आणि पदव्युत्तर पातळीवर सुरु केले. त्यामध्ये बी.एस्सी. अप्लाइड, ॲनैलिटिकल केमेस्ट्री, जॉग्राफिकल सिस्टिम, ऑप्टोमेकम, एम.बी.ए.बायोटेक्नॉलॉजी, एम.एस्सी.इंटिग्रेटेड कोर्स इन बायोटेक्नॉलॉजी, बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी, एम.टेक.एनर्जी स्टडीज आणि इतर अभ्यासक्रमाचा उल्लेख करता येईल. संशोधन क्षेत्रामध्ये विद्यापीठाने अनेक उपक्रम राबविले आणि त्यासाठी राष्ट्रीय वित्त संस्थांकडून भरीव आर्थिक मदत प्राप्त केली. पुणे विद्यापीठाने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची पावती म्हणजे, विश्वविद्यालय अनुदान आयोगाने पुणे विद्यापीठाचा उत्कृष्टतेची क्षमता असलेल्या देशातील पाच विश्वविद्यालयामध्ये समावेश केला. त्या अंतर्गत विश्वविद्यालय अनुदान आयोगाकडून विद्यापीठाला ३० कोटी रुपयांची भरीव आर्थिक मदत मिळाली आहे. विद्यापीठातील प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र या विभागांना सेंटर फॉर ॲडव्हान्स स्टडीज म्हणून विश्वविद्यालय अनुदान आयोगाकडून मान्यता मिळालेली आहे. विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागात भारताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाकडून ‘फिस्ट‘ या योजनेअंतर्गत सव्वाकोटी रुपयांचे अनुदान मिळाले आहे. त्याचप्रमाणे अब्जावंशी तंत्रज्ञान विकासासाठी तीन कोटी रुपयांचे अर्थसहाय्य मिळालेले आहे. बौध्दिक मालकी हक्क या क्षेत्राचा विकास व्हावा, यासाठी सीएसआयआरकडून एक कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. पुणे विद्यापीठातील महाविद्यालयांनी देखील नेत्रदीपक कामगिरी केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून के.टी.एच.एम.कॉलेज, नाशिक, पी.व्ही.पी.महाविद्यालय, प्रवरानगर, सेंट मीरा गर्ल्स कॉलेज, पुणे या महाविद्यालयांना विशेष अनुदान प्राप्त झाले आहे. गुणवत्ता सुधार कार्यक्रमासाठी विद्यापीठाने विद्यापीठ दोन कोटी रुपयांचे अनुदान महाविद्यालयांसाठी प्राप्त करुन देते. या कार्यक्रमांतर्गत सर्व महाविद्यालयांमध्ये व्याख्यानमाला, तसेच स्थानिक, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चासत्र आयोजित केले गेले. पुणे विद्यापीठाने राष्ट्रीय सेवा योजनेखाली

महाविद्यालयांच्या सहकार्याने अनेक चांगल्या योजना कार्यान्वित केल्या आहेत. यामध्ये पाणी आडवा पाणी जिरवा, चर खोदणे, झाडे लावणे अशा अनेक योजनांचे आयोजन केले आहे. त्याचप्रमाणे १५ गावात ७० वनराई बंधारे बांधण्याची योजना यशस्वीपणे राबविली आहे. गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी विद्यापीठ 'कमवा आणि शिका' ही योजना राबविण्यासाठी महाविद्यालयांना अर्थसहाय्य पुरविते. या योजनेचा लाभ महाविद्यालयामधील १० हजार विद्यार्थी घेतात. पुणे विद्यापीठ बहि:शाल शिक्षण केंद्र आणि प्रौढ निरंतर केंद्राव्दारे अनेक अभिनव उपक्रम राबविते. त्यात विद्यार्थी आणि समाजातील अनेक घटक यांच्यासाठी व्याख्याने आयोजित करणे, त्याचप्रमाणे गरजांवर आधारित प्रशिक्षणाचे आयोजन करणे याचा समावेश होतो. पुणे विद्यापीठाने अनेक अग्रगण्य राष्ट्रीय संशोधन संस्था, त्याचप्रमाणे परदेशी विद्यापीठांबरोबर सामंजस्य करार केले आहेत. या करारामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांना उच्च शिक्षणाच्या, त्याचप्रमाणे संशोधनाच्या संधी उपलब्ध होत आहेत. राष्ट्रीय मूल्यांकन समितीने पुणे विद्यापीठाचे मूल्यमापन करुन त्याला पंचतारांकित दर्जा दिला आहे. हा दर्जा मिळविणारे पुणे विद्यापीठ महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ आहे. पुणे विद्यापीठाने रेडिओ केंद्र सुरु करुन एक अभिनव उपक्रम सुरु केला आहे. अशा प्रकारचा उपक्रम सुरु करणारे पुणे विद्यापीठ हे भारतातील दुसरे विद्यापीठ आहे. महाविद्यालयांना स्वायत्तता देण्यासाठी पुणे विद्यापीठाने विशेष प्रयत्न केले आहेत. असे प्रयत्न पुढील पंचवार्षिक योजनेतही सुरु हवेत. इंटरनेटव्दारे महाविद्यालयांची जोडणी करुन त्याव्दारे सर्व विषयातील तज्ज्ञ व्यक्तिंचा संपर्क, शिक्षकांबरोबर घडवून आणण्यासाठी कुलगुरु, डॉ.नरेंद्र जाधव यांनी एक योजना आखली आहे. पुणे विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा उत्कृष्ट आहे, याची पावती परदेशातून पुणे विद्यापीठात शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी देत असतात. सध्या पुणे विद्यापीठामध्ये १० हजाराहून अधिक विद्यार्थी पदवी, पदव्युत्तर आणि विद्यावाचस्पती स्तरावर अध्ययन आणि संशोधन करीत आहेत.

ब) पुणे विद्यापीठाची वाटचाल

पुणे विद्यापीठाने आजवर अभिमानस्पद वाटचाल केली आहे. मात्र येणा—या कालखंडात विद्यापीठाला नवीन आव्हानांना सामोरे जावे लागेल. येणा—या कालखंडात विद्यापीठाला खाजगी विश्वविद्यालय, अभिमत विश्वविद्यालय, त्याचप्रमाणे अभ्यासक्रम चालविणा—या अनेक खाजगी संस्थांशी स्पर्धा करावी लागेल. अशी स्पर्धा करताना विद्यापीठावर अनेक बंधने असणार आहेत. ही बंधने शिथिल करण्यासाठी विद्यापीठाला आपल्या धोरणात लवचिकता आणावी लागेल. त्याचप्रमाणे उपलब्ध साधने आणि प्रशिक्षित मनुष्यबळाचा सुयोग्य वापर कसा करता येईल यासाठी निश्चित योजना आखावी लागेल. विद्यार्थ्यांना केवळ चाकोरीबध्द शिक्षण न देता त्यांच्या क्षमता कशा विकसित होतील याकडे लक्ष द्यावे लागेल. त्यासाठी पदवी स्तरावर श्रेणीपध्दतीचा अवलंब, त्याचप्रमाणे ‘वेब‘ बेस्ड आधारीत अभ्यासक्रमांची निर्मिती, तसेच विद्यार्थ्यांना रिकाम्या वेळात करता येतील असे व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम यांची निर्मिती करावी लागेल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संभाषण क्षमता, त्याचप्रमाणे मुलाखतीचे तंत्र विकसित करण्यासाठी खास प्रशिक्षण उपलब्ध करुन द्यावे लागेल. समाजाच्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त करुन देण्यासाठी विशेष अर्थसहाय्य पुरविण्यासाठी योजना आखाव्या लागतील. शिक्षणात उद्योगधंद्यांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. त्यातून एकत्रित अभ्यासक्रमाची निर्मिती, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण आणि आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य मिळून देणे असे उपक्रम राबवावे लागतील. हे करीत असताना विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळविण्यासाठी नेटाने प्रयत्न करावे लागतील. आंतरराष्ट्रीय स्तरावर या विद्यापीठाचे विद्यार्थी आपला ठसा उमटवतील याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. यासाठी विद्यापीठातील विभाग आणि महाविद्यालये यामध्ये उच्च दर्जाचे संशोधन होण्यासाठी कृती कार्यक्रम

आखावा लागेल.  विद्यापीठाचा विकास यापुढील पंधरा वर्षात कोणत्या दिशेने होईल यासाठी तज्ज्ञ व्यक्तींच्या सहाय्याने आणि सर्व घटकांच्या सूचनांचा विचार करुन एक व्हिजन डॉक्युमेंट विकसित करावा लागेल.  त्याचप्रमाणे पुढील पाच वर्षासाठीचा कृती कार्यक्रम बनवावा लागेल.

## १. माहिती तंत्रज्ञान विस्तार

पुणे विद्यापीठाने माहिती तंत्रज्ञानाचा स्वीकार करुन त्याचा उपयोग शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्यासाठी करण्यास सुरुवात केली आहे. पुणे विद्यापीठ हे विद्यापीठ परिसरातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन देणारे भारतातील पहिले विद्यापीठ आहे.  विद्यापीठाने निर्माण केलेल्या या जाळ्यांचा उपयोग प्रशासन, वित्त विभाग, त्याचप्रमाणे महाविद्यालयांशी संपर्क साधण्यासाठी उपयोग करण्यास सुरुवात केलेली आहे.  अनेक प्रशासकीय बाबींची माहिती, प्रवेशप्रक्रिया, विद्यापीठ परिसरातील निरनिराळे विभाग, त्या विभागामध्ये चालणारे संशोधन आणि अभ्यासक्रम याची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येते.  परंतु पुढील पाच वर्षामध्ये या सुविधांचा विस्तार आणि सबलीकरण होणे आवश्यक आहे,  विद्यापीठाला याची जाणीव आहे.  माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये पुणे विद्यापीठामध्ये चालणारे अभ्यासक्रम इतर देशातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणे शक्य आहे.  त्याचप्रमाणे उत्कृष्ट शिक्षकांची उपलब्धता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना करुन देणे शक्य आहे.  त्या दृष्टिकोनातून माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे शिकविता येतील असे अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रम शिकविण्यासाठी लागणारे साहित्य याच्या निर्मितीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील.

पुणे विद्यापीठाची वाढ खूपच जोमाने होत आहे. पुणे विद्यापीठामध्ये सध्या संलग्न असलेल्या महाविद्यालयांची, संलग्न संस्थेची आणि संशोधन केंद्रांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. पुढील पाच वर्षांच्या कालावधीत यामध्ये आणखी भर पडणार आहे. पुणे विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये शहरांची होणारी वाढ, त्याचप्रमाणे केंद्रीय सरकारचा विशेष आर्थिक प्रभाग (Special Economic Zone) निर्मितीमुळे महाविद्यालयांची गरज वाढत आहे. त्यामुळे विद्यापीठावरील प्रशासकीय भार कमी होऊन, महाविद्यालयांचे काम सुरळीतपणे चालावे यासाठी महाविद्यालयांना स्वायत्तता देणे उचित ठरणार आहे. मागील पाच वर्षामध्ये फारच थोडया महाविद्यालयांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. पुढील काळामध्ये अधिकाधिक महाविद्यालयांना ही योजना स्विकारण्यासाठी प्रवृत्त करावे लागेल. विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी काही योजना आखाव्या लागतील. त्यात गुणवत्ता सुधार कार्यक्रमासाठी महाविद्यालयांना अधिक प्रमाणात आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे, त्याचप्रमाणे शिक्षकांचे आणि प्राचार्यांचे मूल्यमापन करणे, महाविद्यालयांना आपली गुणवत्ता सिध्द करण्यासाठी प्रोत्साहित करणे या योजनांचा समावेश करावा लागेल. पदवीपूर्व स्तरावर श्रेयांकन पध्दतीचा अवलंब केल्यास विद्यार्थ्यांना त्यांचे व्यक्तिमत्व विकासासाठी त्याचप्रमाणे व्यवसायासाठी उपयुक्त असे अभ्यासक्रम घेता येणे शक्य होईल. पदवीपूर्व स्तरावर अशा योजना लागू केल्यास हे एक क्रांतिकारक पाऊल ठरेल.

सरकारकडून मिळणा—या अनुदानात दिवसेंदिवस घट होत आहे. परंतु त्याचबरोबर अधिकाधिक चांगल्या शिक्षकांची, साधनांची गरज वाढत चालली आहे. उत्तम शिक्षकांची उपलब्धता वाढवावयाची असेल तर शिक्षकांचे स्थैर्य, त्याचप्रमाणे सुयोग्य वेतन या गोष्टींचा विचार करावा लागेल. त्यासाठी करार पध्दतीची योजना विकसित करुन ती चांगल्या प्रकारे

अंमलात आणावी लागेल. या कालखंडात अधिकाधिक महाविद्यालयांनी आपले मूल्यांकन करुन घ्यावे यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील.

## २. नवीन महाविद्यालये, संशोधन संस्था आणि पदव्युत्तर विभाग

विद्यापीठाकडे विविध संस्थांकडून विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ नुसार नवीन महाविद्यालय स्थापन करुन विद्यापीठाशी संलग्नता घेण्यासाठी कार्यक्षेत्रातील विविध भागातील दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रांत अर्ज येत असतात. अशा अर्जांचा विचार करताना प्रत्येक विद्याशाखेत किती महाविद्यालये / पदव्युत्तर विभाग स्थापन करणे आवश्यक आणि योग्य आहे याचा विचार करुन शासनाकडे शिफारस करण्यात येते. त्याचप्रमाणे संबंधित ठिकाणची लोकसंख्या, भोवती असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या त्याचप्रमाणे मागणी करणा—या संस्थेची आर्थिक स्थिती तसेच इतर आवश्यक ती पूर्वतयारी बघून शिफारशी करण्यात येतील.

नव्याने पदव्युत्तर विभाग सुरु करण्याची परवानगी देताना संबंधित महाविद्यालयात त्या विषयातील पदवीपूर्व शिक्षण विशेष स्तरावर शिकविण्याचा अनुभव त्याचप्रमाणे आवश्यक त्या पायाभूत सुविधा, ग्रंथालय सुविधा, प्रयोगशाळा (आवश्यक असल्यास) आणि पदव्युत्तर अध्यापनास पात्र असलेल्या प्राध्यापकांची उपलब्धता याबाबत कटाक्षाने विचार करण्यात येईल. यासंदर्भात शिफारशी करताना पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या बाबतीत सद्यस्थिती, संबंधित भागातील गरज व विद्यार्थ्यांची उपलब्धता याबाबींचा विचार करण्यात येईल.

महाविद्यालये/पदव्युत्तर विभाग स्वयंपूर्ण होण्यासाठी किमान व कमाल विद्यार्थी संख्या (शासनाच्या नियमांना अधीन राहून) त्याचप्रमाणे किमान व कमाल विषयांची, विभागांची अथवा उपशाखांची संख्या निर्धारित करण्यात येईल.

कुठल्याही एका विषयात अथवा आंतरविद्याशाखीय क्षेत्राात अध्यापक/संशोधन करणा—या आणि / अथवा विस्तार कार्यक्रम यशस्वीरित्या राबवित असलेल्या संस्थेला संशोधन संस्था म्हणून मान्यता देताना आवश्यक त्या पायाभूत व ग्रंथालयीन सुविधा आणि संबंधित विषयात/क्षेत्रात किमान चार मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक (रिसर्च गाईड) उपलब्ध असल्याची तसेच संबंधित विषयातील सुरु असलेल्या अध्यापन, संशोधन, विस्तार कार्यक्रम अद्ययावत आणि कालानुरुप असल्याची खात्री करुन घेतल्यावर मान्यता देण्यात येईल. कालानुरुप आणि उपयुक्त संशोधन संस्था विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल.

शासनाने केलेल्या सूचनेनुसार पुणे विद्यापीठाशी संलग्न तिन्ही जिल्हयातील प्रत्येक तालुक्याचा विचार करुन विविध शाखातून महाविद्यालयांची शिफारस केली आहे. त्यासाठी लोकसंख्या, दुर्गम व आदिवासी भागात असलेली महाविद्यालये, स्थानिक गरजा विचारात घेवून महाविद्यालयांची शिफारस केली गेली आहे. पुणे विद्यापीठात कला, विज्ञान व वाणिज्य या महाविद्यालयासाठी शहरी भागात अनुदान न देण्याचे शासनाचे धोरण आहे, त्यामुळे अशा महाविद्यालयांची शिफारस करताना डोंगरी, आदिवासी अशा भागांचा विचार केला आहे. त्यामुळे तालुकानिहाय अशी महाविद्यालयांची शिफारस केली आहे. शहरांमध्ये सत्र महाविद्यालयांची गरज दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. प्रमुख शहरांमध्ये सत्र महाविद्यालयाची शिफारस केली आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये प्रचलित अभ्यासक्रमाबरोबरच इतर अभ्यासक्रम सुरु करण्याची आवश्यकता आहे. त्यात अनेक नवीन तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रमांबरोबरच स्थानिक गरजांच्या अभ्यासक्रमांची निर्मिती करणे आवश्यक आहे. उदा :— नाशिक परिसरात द्राक्ष पिकांसंबंधी, तर चाकण परिसरात विमानतळासाठी लागणा—या सेवांसंबंधी अभ्यास सुरु करण्यास प्राधान्य द्यावे.

पदवीपूर्व अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाबाबत बायोटेक्नॉलॉजी आणि बायोइन्फर्मॅटिक्स, स्पेस सायन्स, कम्युनिकेशन स्टडीज, हेल्थ सायन्सेस, मानवी अविष्कार (Human Rights), निरनिराळया परदेशी भाषांविषयक अभ्यासक्रम, संरक्षण विषयी अभ्यासक्रम, अब्जांशी तंत्रशास्त्र (Nano Technology), इत्यादि बाबतीत परवानगी देताना महाराष्ट्र शासनाने आपल्या धोरणात लवचिकता आणावी, असे पुणे विद्यापीठाला वाटते. त्याचप्रमाणे विज्ञान, अभियांत्रिकी, मानसनीती व समाजविज्ञान, वाणिज्य, व्यवस्थापन, विधी, औषधनिर्माणशास्त्र, शिक्षणशास्त्र शारीरिक शिक्षणशास्त्र क्रिडा, इ. विद्याशाखेतील नवनवीन अभ्यासक्रमांना परवानगी देताना महाराष्ट्र शासनाचे लवचिक धोरण असले पाहिजे. त्याचप्रमाणे या विद्याशाखांमध्ये नवनवीन गोष्टींचा आढावा घेऊन पुणे विद्यापीठाने आपल्या शैक्षणिक बृहत् आराखडयाचे पुनरावलोकन (तपासणी) प्रत्येक वर्षी केली पाहिजे, असें पुणे विद्यापीठाला वाटते.

पदव्युत्तर अभ्यासक्रमाविषयी शैक्षणिक आराखडयात नोंदणी करणे आवश्यक आहे.  त्या खालीलप्रमाणे असाव्यात.

१.  **औषधनिर्माण शास्त्र विद्याशाखा**

या विद्याशाखेमध्ये ज्या औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयांनी सहा वर्षे पूर्ण केली आहेत, त्या सर्व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमा सुरु करण्यास परवानगी द्यावी.  त्यामुळे औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखेतील महाविद्यालयास योग्य तो तज्ज्ञ शिक्षणवर्ग त्याचप्रमाणे औषधनिर्माण शास्त्र उद्योगधंद्यास या तज्ज्ञांचा लाभ होऊ शकेल. त्याचप्रमाणे या विद्याशाखेमध्ये महाविद्यालयांची गुणवत्ता पाहून पीएच.डी (Ph.D) सारख्या अभ्यासक्रमांना महाराष्ट्र शासनाने परवानगी द्यावी, असे पुणे विद्यापीठास वाटते. पुणे विद्यापीठ परिसरामध्ये औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखेचा पदव्युत्तर विभाग सुरू करणे जरूरीचे आहे. या पदव्युत्तर विभागात M.Pharm, Ph.D या अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाईल.

२.  **अभियांत्रिकी विद्याशाखा**

या विद्याशाखेमध्ये ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयांनी सहा वर्षे पूर्ण केली असतील त्या अभियांत्रिकी महाविद्यालयांना पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी द्यावी.  त्यामुळे अभियांत्रिकी विद्याशाखेतील वाढत्या महाविद्यालयास योग्य तज्ज्ञ शिक्षणवर्ग त्याचप्रमाणे अभियांत्रिकी उद्योगधंद्यास या तज्ज्ञाचा लाभ होऊ शकेल.  त्याचप्रमाणे या विद्याशाखेमध्ये महाविद्यालयांची गुणवत्ता पाहून पीएच.डी. (Ph.D) सारख्या अभ्यासक्रमांना महाराष्ट्र शासनाने परवानगी द्यावी, असे पुणे विद्यापीठास वाटते. पुणे विद्यापीठ परिषदेमध्ये अभियांत्रिकी विद्याशाखेचा पदव्युत्तर विभाग सुरू करणे जरूरीचे आहे. या पदव्युत्तर विभागात M.E., Ph.D या अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाईल.

### ३. शिक्षणशास्त्र विद्याशाखा

पुणे विद्यापीठाशी सुमारे ५५ शिक्षणशास्त्र महाविद्यालये संलग्नित आहेत. त्याचप्रमाणे सहा शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये संलग्नित आहेत. यापैकी ज्या महाविद्यालयांनी सहा वर्षे पूर्ण केली असतील त्या महाविद्यालयांना बी प्लस किंवा त्यावरील श्रेणी प्राप्त झाली असेल त्या सर्व महाविद्यालयांना पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी द्यावी.

उदा. M.Ed., M.PEd याचप्रमाणे M.Ed. (H.I.) हे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी वरील निकषांवर परवानगी द्यावी.

### ४. शारीरिक शिक्षणशास्त्र विद्याशाखा

शारीरिक शिक्षणशास्त्र विषयात क्रिडा व्यवस्थापन, क्रिडा पत्रकारिता त्याचप्रमाणे योग आणि आरोग्य या विषयात पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास प्रोत्साहन द्यावे.

### ५. विधी विद्याशाखा

सध्या विधी विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रम केवळ पुणे विद्यापीठातच शिकविले जातात, कोणत्याही संलग्नित महाविद्यालयात शिकविले जात नाहीत. ज्या विधी महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमांचे कायम संलग्निकरण झालेले आहे अशा महाविद्यालयांना विधी विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची प्रक्रिया सुरु करावी.

### ६. पारंपारिक विद्याशाखा

पारंपारिक विद्याशाखेमध्ये कला, वाणिज्य, मानसनीती व समाजविज्ञान या विद्याशाखांचा समावेश होतो. या विद्याशाखेमध्ये अनेक नवीन पदव्युत्तर प्रमाणपत्रे वा पदविकांचा अभ्यासक्रम निरनिराळया महाविद्यालयांना चालू करण्यास परवानगी द्यावी, असे धोरण पुणे विद्यापीठाने आखले पाहिजे.

### ७. विज्ञान विद्याशाखा

जागतिकीकरणाच्या काळामध्ये तंत्रज्ञानाला अतिशय महत्व प्राप्त झालेले आहे. विज्ञान व तंत्रज्ञान हे फार मोठया वेगाने प्रगती करीत आहे. विशेष करुन हेल्थ सायन्स (Health Sciences), माहिती तंत्रज्ञान (Information Technoilogy), जैवतंत्रज्ञान (Bio- Technoilogy), न्यानो टेक्नॉलॉजी (Nano Technoilogy), स्पेस सायन्सेस इत्यादि क्षेत्रामध्ये प्रचंड वेगाने प्रगती होत आहे. जागतिक पातळीवर होणा—या या प्रगतीचा लाभ विद्यार्थ्यांना मिळणे अतिशय आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून या विषयांची पदव्युत्तर अभ्यासक्रमांची मोठया प्रमाणात जरुरी आहे. असे नवनवीन अभ्यासक्रम निरनिराळया विद्यापीठांच्या विभागांमध्ये त्याचप्रमाणे निरनिराळया महाविद्यालयांमध्ये चालू करणे आवश्यक आहे.

यातील काही अभ्यासक्रम हे खर्चिक स्वरुपाचे असल्याने कदाचित् एखाद्या महाविद्यालयाला हे चालू करणे जमणार नाही, त्यामुळे पुणे विद्यापीठाने पुढाकार
घेऊन या अभ्यासक्रमांची उपलब्धता जिल्हा पातळीवर करुन दिल्यास त्याचा लाभ पुणे विद्यापीठातील भारतीय विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर होईल असे वाटते.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ १९९८ साली स्थापन झाले आहे. पदवी व पदविका (Degree & Diploma) हे सर्व अभ्यासक्रम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाशी संलग्नित करण्यात आलेले आहेत. परंतु या विद्याशाखांमध्ये निरनिराळे प्रमाणपत्र अभ्यासक्रम व Ph.D.(By Research) हे अभ्यासक्रम पुणे विद्यापीठामध्ये चालू राहावे. अनेक वेळेस पीएच.डी.चा विषय हा आंतरविद्याशाखीय असल्यामुळे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संबंधित सर्व विद्याशाखांचे पीएच.डी.ची सुविधा असणे जरुरीचे आहे. अनेक वेळेस औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा, अभियांत्रिकी विद्याशाखा, विज्ञान विद्याशाखा यांचे आंतरविद्याशाखीय महत्वाचे संशोधनाचे विषय असतात.

## ८. व्यवस्थापन विद्याशाखा

व्यवस्थापन विद्याशाखेमध्ये नवनवीन अभ्यासक्रम सुरु होत आहेत. अनेक अभिमत विद्यापीठे या विषयांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करीत आहेत. पुणे विद्यापीठाने सुध्दा असे नवीन अभ्यासक्रम सुरु करून ते पुणे विद्यापीठ व व्यवस्थापन विद्याशाखेच्या संस्थांमध्ये चालू करणे जरुरीचे वाटते. व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत काही आंतरविद्याशाखीय (Inter Disciplinary) अभ्यासक्रम सुरु करणे जरुरीचे आहे. उदा. बी.ई., एम.बी.ए. सारखे अभ्यासक्रम स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये सुरु करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे Foreign Trade, Event Management, Hospitality Management इ.अनेक विषयांचे प्रमाणपत्र तसेच पदवी किंवा पदविका अभ्यासक्रम चालू करणे जरुरीचे आहे. असे अभ्यासक्रम चालू करणा—या निरनिराळया संस्थांना कोणतेही निर्बंध न घालता परवानगी द्यावी, असे वाटते.

एकविसाव्या शतकात उच्च व तंत्रशिक्षण प्रचंड वेगाने विकसित होत आहे. याबाबतीत पुढील पाच वर्षाच्या शैक्षणिक विकासाची व्यवस्थितपणे आखणी केली नाही तर “थांबला तो संपला” या उक्तीप्रमाणे कोणत्याही संस्थेची प्रगती व विकास थांबण्याची शक्यता आहे. पुढील पाच वर्षाचे शैक्षणिक धोरण आखताना ते धोरण दूरदृष्टी ठेऊन व लवचिकता (Flexibility) ठेऊन आखले पाहिजे.

जागतिक स्तरावरील अनेक विद्यापीठे पुढच्या काळामध्ये भारतामध्ये नवनवीन अभ्यासक्रम घेवून पदार्पण करणार आहेत. अशा जागतिक स्तरावरील विद्यापीठांचे आकर्षण तरुण विद्यार्थी—विद्यार्थिनी साहजिकच राहणार आहेत. या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी योग्य तो दृष्टिकोन ठेवून नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन नवीन अभ्यासक्रम सुरु करणे ही काळजी घेणे जरुर आहे. उच्च शिक्षणातील गुंतवणूक ही देशाच्या प्रगतीमधील गुंतवणूक आहे, असे समजले तर या शैक्षणिक विकासाच्या बृहत् आराखडयाची मांडणी करणे किती महत्वाचे आहे, याचा बोध होऊ शकेल.

या बृहत् आराखडयाचे पुनरावलोकन प्रत्येक वर्षी करणे व त्यातील बदल शासनाला कळविणे हे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४, कलम ८२(१) नुसार जरुरीचे आहे.

या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन दि. २७.७.०७ व दि. ४.८.०७ रोजी झालेल्या महाविद्यालये आणि विद्यापीठ विकास मंडळाच्या सभेमध्ये सुचविलेल्या पुणे, नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यामधील शहर आणि तालुकानिहाय, विविध विषयांच्या महाविद्यालयांची यादी अनुक्रमे परिशिष्ट क्रमांक १, २ आणि ३ मध्ये दिली आहे. ही परिशिष्टे सोबत जोडली आहेत.

## पुणे विद्यापीठ

सूचना : १) विद्यापीठ परिपत्रक क्र. १७५/१९७२—७३ नुसार रात्र महाविद्यालयांना फक्त कला व वाणिज्य महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी देण्यात यावी मात्र विज्ञान विद्याशाखेस परवानगी देण्यात येऊ नये.

२) ज्या महाविद्यालयांमध्ये किमान १० वर्षे विज्ञान विद्याशाखा कार्यरत आहे अशा महाविद्यालयांमध्ये बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी विषय सुरू करण्यास परवानगी द्यावी.

३) शिक्षणशास्त्र कर्ण—बधिर महाविद्यालये पुणे जिल्हयात दोन, नाशिक आणि नगर जिल्हयात प्रत्येकी एक अशा चार महाविद्यालयांना परवानगी द्यावी.

४) एव्हिएशन इंजिनीअरिंग आणि मशीन इंजिनीअरिंग साठी पुणे जिल्हयासाठी दोन आणि नाशिक व नगर जिल्हयासाठी प्रत्येकी एक अशा चार महाविद्यालयांना परवानगी द्यावी.

५) इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स साठी पुणे शहर, पुणे जिल्हा, अहमदनगर व नाशिक येथे प्रत्येकी एका संस्थेसाठी परवानगी द्यावी.

## महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (१) नुसार सुधारित केलेला शैक्षणिक वर्ष २००८—०९ या वर्षाचा बृहत् आराखडा

तक्ता क्र. १

पुणे जिल्हा पदवी अभ्यासक्रम

तालुका निहाय प्रस्तावीत नवीन महाविद्यालये

| अ. क्र. | तालुका | कला, वाणिज्य व विज्ञान | बी.एड. | विधी | फाईन आर्टस् ॲण्ड क्राफ्टस् | शारीरिक शिक्षणशास्त्र | अभियांत्रिकी | वास्तुशास्त्र | फार्मसी | आयु. होमि. | युनानी/ वैद्याकीय दंत वैद्यकीय | व्यवस्थापन—शास्त्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. |
| १ | पुणे शहर प्रस्तावित | ८(५ रात्र) | १ इंग्रजी माध्यम | २ | २ | १ | ४ | १ | २ | — | — | ४ |
| २ | पिंपरी चिंचवड | ४ (२ रात्र) | १ इंग्रजी माध्यम | २ | २ | १ | ४ | १ | २ | — | — | ३ |
| ३ | हवेली | २ | — | १ | १ | — | १ | — | १ | — | — | २ |
| ४ | खेड | १ | — | — | १ | — | १ | — | १ | — | — | १ |
| ५ | आंबेगांव | २ | — | — | — | — | १ | — | १ | — | — | १ |

| १ | २ | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | जुन्नर | — | — | — | १ | — | १ | — | — | — | — | १ |
| ७ | शिरूर | १ | — | — | १ | — | १ | १ | — | — | — | — |
| ८ | दौंड | — | — | — | — | — | १ | — | १ | — | — | १ |
| ९ | इंदापूर | १ | — | — | — | — | १ | — | १ | — | — | १ |
| १० | बारामती | १ | — | — | १ | — | — | १ | — | — | — | १ |
| ११ | पुरंदर | — | — | — | १ | — | १ | १ | — | — | — | १ |
| १२ | भोर | १ | — | — | १ | — | १ | १ | — | — | | १ |
| १३ | वेल्हा | १ | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १४ | मुळशी | २ | — | — | १ | — | १ | १ | १ | — | — | २ |
| १५ | मावळ | २ | — | — | १ | — | १ | १ | १ | — | — | २ |
| **नवीन महाविद्यालये एकूण—१०७** | | **२६** | **०२** | **०५** | **१३** | **०२** | **१९** | **०८** | **११** | **००** | **००** | **२१** |

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (१) नुसार सुधारित केलेला शैक्षणिक वर्ष २००८—०९ या वर्षाचा बृहत् आराखडा

तक्ता क्र. २

अहमदनगर जिल्हा पदवी अभ्यासक्रम

तालुका निहाय प्रस्तावित नवीन महाविद्यालये

| अ. क्र. | तालुका | कला, वाणिज्य व विज्ञान | बी.एड. | विधी | फाईन आर्टस् ॲण्ड क्राफ्टस् | शारीरिक शिक्षणशास्त्र | अभियांत्रिकी | वास्तुशास्त्र | फार्मसी | आयु. होमि. | युनानी/ वैद्याकीय दंत वैद्यकीय | व्यवस्थापन—शास्त्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. |
| १ | नगर | शहर २ (१ रात्र) तालुका १ =३ | — | १ | १ | — | तालुका २ शहर १ | शहर १ | तालुका १ | — | — | शहर १ तालुका १ =२ |
| २ | राहूरी | — | — | — | १ | — | १ | — | १ | — | — | १ |
| ३ | श्रीरामपूर | — | — | — | — | — | १ | — | १ | — | — | — |
| ४ | राहाता | — | — | — | — | — | — | — | — | — | — | १ |
| ५ | नेवासा | — | — | — | — | — | १ | — | — | — | — | १ |
| ६ | शेवगांव | — | — | — | — | — | १ | — | — | — | — | — |
| ७ | पाथर्डी | — | — | — | — | — | — | — | १ | — | — | १ |
| ८ | जामखेड | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ९ | कर्जत | — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |

| १ | २ | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | श्रीगोंदा | — | १ | १ | — | — | १ | — | १ | — | — | १ |
| ११ | पारनेर | १ | — | — | — | — | १ | — | १ | — | — | १ |
| १२ | अकोले | १ | — | — | — | — | १ | — | १ | — | — | १ |
| १३ | संगमनेर | — | — | — | १ | — | — | — | — | — | — | १ |
| १४ | कोपरगांव | — | — | १ | — | — | — | — | — | — | — | १ |
| **प्रस्तावित नवीन महाविद्यालये एकूण—४१** | | ०५ | ०१ | ०३ | ०३ | ०० | १० | ०१ | ०७ | ०० | ०० | ११ |

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (१) नुसार सुधारित केलेला शैक्षणिक वर्ष २००८—०९ या वर्षाचा बृहत् आराखडा

तक्ता क्र. ३

नाशिक जिल्हा पदवी अभ्यासक्रम

तालुका निहाय प्रस्तावित नवीन महाविद्यालये

| अ. क्र. | तालुका | कला, वाणिज्य व विज्ञान | बी.एड. | विधी | फाईन आर्टस् ॲण्ड क्राफ्टस् | शारीरिक शिक्षणशास्त्र | अभियांत्रिकी | वास्तुशास्त्र | फार्मसी | आयु. होमि. | युनानी/ वैद्याकीय, दंत वैद्यकीय | व्यवस्थापन—शास्त्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. |
| १ | नाशिक | नाशिक शहर २ (१ रात्र) तालुका + १ = ३ | १ इंग्रजी माध्यम | १ | १ | — | २ | १ | १ | — | — | २ |
| २ | पेठ | १आदिवासी/ डोंगरीभाग | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ३ | त्र्यंबकेश्वर | १आदिवासी/ डोंगरीभाग | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ४ | दिंडोरी | १आदिवासी/ डोंगरीभाग | — | — | — | — | १ | — | १ | — | — | — |
| ५ | सुरगाणा | १आदिवासी/ डोंगरीभाग | — | — | — | — | — | — | १ | — | — | १ |
| ६ | कळवण | १आदिवासी/ डोंगरीभाग | — | — | — | — | १ | — | — | — | — | १ |
| ७ | बागलाण | १आदिवासी/ डोंगरीभाग | — | — | — | — | १ | — | — | — | — | १ |

| १ | २ | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | मालेगांव | **१रात्र + १ उर्दू + ३सर्वसाधारण = ५** | — | १ | १ | — | १ | — | — | — | — | १ |
| ९ | चांदवड | **१** | — | — | — | — | १ | — | — | — | — | — |
| १० | नांदगांव | **१** | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ११ | येवला | **१** | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १२ | निफाड | — | — | — | — | — | — | — | १ | — | — | १ |
| १३ | सिन्नर | **१** | — | — | — | — | १ | — | — | — | — | १ |
| १४ | इगतपुरी | **१आदिवासी/ डोंगरीभाग** | — | — | — | — | — | — | — | — | — | १ |
| १५ | देवळा | **२आदिवासी/ डोंगरीभाग** | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १६ | सिल्वासा (दादरा नगर हवेली) | — | — | — | — | — | १ | १ | — | — | — | १ |
| **प्रस्तावित नवीन महाविद्यालये एकूण—५१** | | **२१** | ०१ | ०२ | ०२ | ०० | ०९ | ०२ | ०४ | — | — | १० |